N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-1 (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** दिघी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0405 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/09/2024 01:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 18/09/2024
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/09/2024
**Time From (वेळेपासून):** 10:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/09/2024 **Time (वेळ):** 01:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/09/2024 01:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गुरुदेवदत्त महा ई सेवा केंद्र,दिघी

(c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. भारत मारुती मंडले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सर्वे नं84/2, परांडे गिरणी,साई पार्क, दिघी, पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सर्वे नं84/2, परांडे गिरणी,साई पार्क, दिघी, पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9130423136

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. संतोष बबन वाळके | | | 1. श्री स्वामी समर्थ कलनी, गिरीज फलट क्र01, साई पार्क, दिघी, दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | श्रीमती नंदा राजु शिवरकर | | | 1. गणपती मंदीराजवळ,निरंकार कलनी, शिवनगरी,आदर्श नगर, दिघी पुणे ,दिघी,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

CR 405/2024 जबाब दि.19/09/2024

माझे नांव- श्री. भारत मारुती मंडले वय 54 वर्षे, व्यवसाय - वॉचमन, रा. सर्वे नं.84/2, परांडे गिरणी, साई पार्क, दिघी, पुणे 411015 मो. 9130423136

मी वरिल ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहण्यास असुन मी तलेरा बिल्डर, एफ सी रोड येथे वॉचमनचे काम करतो. मी मागील 20 वर्षापासुन दिघी पुणे या परिसरात राहण्यास आहे. मला शासनाच्या घरकुल योजनेसाठी अर्ज करायचा असुन त्यासाठी उत्पन्न व डोमेसाईल दाखल्याची गरज आहे. त्यासाठी मी दि.12/09/2024 रोजी आमचे घराशेजारी असलेले गुरूदेवदत्त महा ई सेवा केंद्र, दिघी येथे विचारना करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी सदरच्या ई सेवा केंद्राचे केंद्रचालक श्री.वाळके व कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांनी मला तहसिल कार्यालयात ओळख असल्याचे सांगुन वरील काम करुन देण्यासाठी त्यांच्याकरीता रु. 5,000/- द्यावे लागतील अशी मागणी केली होती. सदरच्या दाखल्याबाबत मी ऑनलाईन तपासनी केली असता सदरच्या कामासाठी इतकी रक्कम लागत नसल्याचे मला समजुन आले आहे. यावरुन सदरची रक्कम हि लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. सदरची लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नाही. माझे व गुरूदेवदत्त महा ई केंद्रातील कोणाही व्यक्तीशी माझे आर्थिक हितसंबध अथवा वैर नाही. त्यामुळे दि.12/09/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडे वरील हकीकताची तक्रार दिली होती.

त्यावरुन दि.18/09/2024 रोजी पुढील कार्यवाहीकामी पोनि. माने, यांनी पडताळणी कारवाई साठी शासकीय पंचासह गुरुदेवदत्त महा ई सेवा केंद्र, दिघी येथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर देवून 11.23 वा. मला पाठविण्यात आले होते. सदर पडताळणी कारवाईमध्ये मी गुरुदेवदत्त महा ई सेवा केंद्राचे केंद्रचालक श्री.वाळके व कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांची भेट घेतली असता त्यावेळी आमचेत उत्पन्न व डोमेसाईल दाखला काढण्यावरुन चर्चा झाली. आमचे चर्चे दरम्यान केंद्रचालक श्री.वाळके व कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांनी माझे उत्पन्न व डोमासाईल दाखला मिळवुन देण्यासाठी म्हणुन स्वत:साठी व तहसिल कार्यालयातील कर्मचारी यांच्यासाठी रु.5,000/- ची लाच मागणी केली आहे. त्यावर मी पैसे व फोटो घेवून येतो असे म्हणुन लाप्रवि पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो होतो.

त्यानंतर सापळा कारवाईसाठी लागणारी लाच रक्कम म्हणुन देणेकामी माझ्या बचतीमधील रोख रक्कम- 2,500/- रुपये लाच रक्कम म्हणुन हजर केली असता पोनि. माने यांनी सापळा कारवाईसाठी मी दिलेल्या नोटांचे क्रमांक शासकीय पंचासमक्ष लिहुन घेवुन त्यास अँथ्रसिन पावडर लावुन, सापळा कारवाईचे प्रात्यक्षीक समजावुन सांगुन तसेच सुचना देवून लाच रक्कम माझे शर्टाचे डावे खिशात ठेवण्यात आली. मला रेकॉर्डर देवून पंचासह गुरूदेवदत्त महा ई सेवा केंद्र, दिघी येथे 16.13 वा. पाठविण्यात आले. सदर वेळी सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजुला माझे इशा-याची वाट पहात थांबुन होते.

मी गुरूदेवदत्त महा ई सेवा केंद्र, दिघी येथे कार्यालयात शासकीय पंचासह केंद्रचालक श्री.वाळके व कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांनी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम देण्यासाठी गेलो होतो. सदर ठिकाणी केंद्रचालक श्री.वाळके हे हजर नसल्याने माझी भेट कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांचेशी झाली. सदर वेळी आमचे मध्ये माझ्या कामाबाबत चर्चा झाली.

त्यावेळी कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर म्हणाल्या की, पेमेंट करताय असे म्हणाले असता मी त्यांना पेमेंट डोमासाईल व ह्याचे मिळून 2,500/- करतोय की, बाकीचे नंतर करतो, तुमची प्रोसेस पूर्ण झाली की देतो, त्याशिवाय तुम्ही सर्टीफिकेट ताब्यात देणार नाही ना असे म्हणालो असता कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर म्हणाल्या की, अडीच हजार जमा करा, कॅश कि ऑनलाईन,त्यावर मी कॅश असे बोललो असता त्यांनी परत माझ्याकडे ठिक आहे, पावती संध्याकाळी होऊन जाईल, नाही तर सकाळी आज आठ वाजेपर्यंत एक पावती होऊन जाईल, डोमासाईलची नंतर देते असे म्हणाले असता आमच्यात इतर चर्चा झाल्याने मी माझ्या शर्टाचे खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचेसमोर धरुन अडीच हजार मग....ठेवा.. असे म्हणालो असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन लाच रक्कम मोजुन घेवुन त्यांचे टेबलचे ड्रावर मध्ये ठेवुन लाच रक्कम स्विकारली आहे.

त्यानंतर मी नियोजीत इशारा केल्याने सापळा पथकाने कॉम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांना ताब्यात घेतले आहे. सदर वेळी शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम हस्तगत करण्यात आली असुन त्याची शासकीय कॅमेरामध्ये त्याची व्हिडीओ रेकॉडींग करण्यात आलेली आहे. याबाबतचे सविस्तर पंचनामे व स्क्रिप्ट पंचासमक्ष करण्यात आलेले आहेत.

तरी मी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई वरुन गुरूदेवदत्त महा ई सेवा केंद्र चालक श्री. वाळके व कम्प्युटर ऑपरेटर श्रीमती शिवरकर यांनी माझे उत्पन्न व डोमासाईल दाखला मिळवुन देण्यासाठी म्हणुन स्वत:साठी व तहसिल कार्यालयातील कर्मचारी यांच्यासाठी रु.5,000/- ची लाच मागणी करुन रु.2,500/- लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली असता बरोबर व खरी लिहीली आहे.

समक्ष हा जबाब दिला...

(विरनाथ माने)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि,पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BAPU DATTATRAY DHERE(I (Inspector)) / PC94330 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BAPU DATTATRAY D

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PC94330

ठाणे अंमलदार
दिघी. पो. स्टे., पिंपरी चिंचवड